REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख १३ आक्टोबर, १९४८ अंक ४१

## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )


| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,६२,००० रु. |
| भरलेलें भांडवल | ९३,११० रु. चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,०९,८४० रु. चे वर |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. चे वर |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदीविक्री व व्याज वसुली वगैरे

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार**
**या बँकमार्फत केले जातात.**

बँकेनें नवीन शेअर्स विक्रीस काढले असून शेअर विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर रु. ५०/- चा असून अर्जासोबत दर शेअरमागे रु. २५/- ( रु. ५/- प्रिमीयम् म्हणून व रु. २०/- अर्जासोबतचे ) रक्कम भरणेची आहे. उरलेली रु. ३०/- ची रक्कम जरूर लागेल त्यावेळीं रु. १०/- चा एक याप्रमाणें ३ हप्त्यांनीं वसूल करणेंत येईल. दोन हप्त्यांमधील अंतर ३ महिन्यांचेपेक्षां कमी असणार नाहीं. शेअर अर्ज व इतर माहिती पाहिजे असल्यास बँकेचे ऑफिसमध्यें मिळेल.

ना. पां. ठाणेदार
मॅनेजर



अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

## किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें






## मशिनरी खरेदीचा प्रश्न

कोणतीहि मशिनरी खरेदिण्यापूर्वी आमचा सल्ला घ्या.
आमचें सहकार्य आपल्या नेहमींच फायद्याचें ठरेल.
लेथ्स, ड्रिलिंग मशिन्स, ऑइल एंजिन्स, वगैरेचे विक्रेते.

केळकर बंधू, बुधवार चौक. पुणें २.


## विविध माहिती

**मद्रास प्रांतांतील महारोगी**—मद्रास प्रांतांत सुमारें १ लाख महारोगी आहेत. ह्या सर्वांनाच निराळया वसाहतींत ठेवणें सरकारला शक्य झालेलें नाहीं. तथापि, २ हजार रोग्यांना निरनिराळया संस्थांतून ठेवण्यांत आलें आहे. महारोग हा संसर्गजन्य रोग असल्यामुळें त्या रोगानें पछाडलेल्या लोकांना वेगळे ठेवण्याची आवश्यकता असते. मद्रास सरकार जिल्हावारी ह्या रोग्यांची माहिती काढणार आहे.

**मोटारींसाठी द्रव स्थितींतील 'मेथेन'**— मोटारींना लागणाऱ्या पेट्रोल ऐवजीं द्रव स्थितींतील मेथेनचा उपयोग लवकरच करतां येऊं लागेल असें एका ब्रिटिश शास्त्रज्ञाचें म्हणणें आहे. एक छोटी मोटार ह्या जळणावर यशस्वी रीतीनें पळविता आली. तथापि व्यापारी दृष्टीनें अजून मेथेन वापरणें परवडत नाहीं. लवकरच तेंहि शक्य होईल असें ह्या शास्त्रज्ञाचें मत आहे.

**कानडाकडून गहूं मिळाला**— कानडाच्या व्हीट बोर्डानें हिंदुस्थानला ३ लाख टन गहूं मंजूर केल्याचें जाहीर केलें आहे. नोव्हेंबरपासून गव्हाच्या वहातुकीला प्रारंभ होऊन ती जुलै १९४९ पर्यंत चालेल. हा सर्व गहूं पॅसिफिक महासागराच्या मार्गानें येणार आहे.

**रशिआ – हिंदुस्थान व्यापार**—रशिआकडून हिंदुस्थानला आतांपर्यंत २९,५०० टन गहूं आला आहे. उभय देशांत झालेल्या करारान्वयें ह्या वर्षअखेर हिंदुस्थानांतून चहाच्या पेट्या रशिआला धाडण्याची व्यवस्था करण्यांत येत आहे.

**परदेशीय प्रवाशांपासून उत्पन्न**—ब्रिटन निर्यात करीत असलेला कोठल्याहि मालाच्या उत्पन्नाच्या प्रमाणापेक्षा ब्रिटनमध्यें येणाऱ्या प्रवाशांपासून होणाऱ्या उत्पन्नाचें प्रमाण अधिक होण्याचा संभव आहे, असे ब्रिटनच्या बोर्ड ऑफ ट्रेडच्या अध्यक्षांनीं नुकतेच उद्गार काढले.

**मलायाला रशिअन बोटी**—मलयांतून रबर आणण्यासाठी रशिआ ह्या महिन्यांत तीन बोटी पाठविणार असल्याची बातमी आहे! ऑक्टोबर महिन्यांत रशिआकडे ३० हजार टन रबर निर्यात केलें जाईल, असा मलायांतील अंदाज आहे.

**सगळ्यांत जास्त पगार मिळविणारे वैमानिक**—पाकिस्थानांतून हैद्राबाद संस्थानांत सिडने कॉटन हा शस्त्रसामुग्रीची आयात विमानानें करीत होता. सिडने कॉटन ह्यानें लँकेस्टर जातीचीं ४ विमानें व ३० वैमानिक नौकरीला ठेवले होते. ह्या वैमानिकांत ब्रिटिश, अमेरिकन आणि इतर युरोपिअन वैमानिकांचा भरणा होता, व त्यांना उड्डाणाच्या दर तासाला २ हजार रुपये मिळत असत, असें म्हणतात. स्वतः सिडने कॉटन हा राडरच्या साह्यानें विमान चालवूं शकणारा तज्ज्ञ वैमानिक होता.

**बेल्जम-हिंदुस्थान व्यापार** — हिंदुस्थानाशीं व्यापार करण्याची शक्यता अजमावण्यासाठी बेल्जमचें सरकार एक व्यापारी मंडळ हिंदुस्थानाला पाठविण्याचा विचार करीत आहे. बेल्जमच्या मुख्य प्रधानांनीं ह्याविषयीं त्या देशांतील धंदेवाल्यांशीं नुकतीच चर्चा केली.

**हिंदी लष्करासाठी मोटारी**—ब्रिटनमध्यें नुकतेंच एक मोटारींचें प्रदर्शन भरलें होतें. ह्या प्रदर्शनांत भाग घेणाऱ्या एका मोटारीच्या कारखान्याकडे हिंदी लष्करासाठी २५० मोटारगाड्यांची मागणी करण्यांत आली आहे. ह्या मोटारींची किंमत २॥ लाख पौंड होईल. मोटारी ताबडतोब पाठविण्याचें कबूल करण्यांत आलें असून त्या मद्रास येथें जुळविण्यांत येतील.

**अणुशक्तीसाठी नवें खनिज**—बेल्जिअन कांगो (आफ्रिका) मध्यें अणुशक्तीच्या उत्पादनाला उपयोगी पडण्यासारखें एक नवें खनिज सांपडलें असल्याचें समजतें. ह्या खनिजाचा रंग हिरवा असून अमेरिकेंतील रॉकी पर्वतांत सांपडणाऱ्या त्याच प्रकारच्या खनिजाशीं सदृश असें तें आहे.

**चीनला अमेरिकेची मदत**—मार्शल मदत योजनेप्रमाणें अमेरिका चीनला आणखी ५ लाख, ४९ हजार डॉलर्सची मदत करणार आहे. ह्या मदतींत यंत्रें, रसायनें, कापूस, लोकर, अन्न, इत्यादि वस्तूंचा समावेश करण्यांत आला आहे.

**जागतिक सहकारी परिषद्**—प्रागला भरलेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघाच्या कॉंग्रेसला हजर राहून प्रो. हिरालाल काजी नुकतेच परत येण्यास निघाले. कॉंग्रेस यशस्वी झाली असें त्यांनीं वृत्तपत्र-वार्ताहरांना सांगितलें. कॉंग्रेसमध्यें दोन तट पडल्याचें त्यांना दिसून आलें. ब्रिटन, फ्रान्स, स्कँडिनेव्हिआ, बेल्जम, हॉलंड ह्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींचें मत सहकारी चळवळ ही खुषीच्या सहकार्यावर आधारावी असें दिसून आलें. उलट, सो. युनिअनच्या नेतृत्वाखालील देशांच्या प्रतिनिधींचें मत राज्यसंस्थेनें सक्तीनें सहकार्य घडवून आणावें, असें पडलें.

**पाकिस्तानला परदेशी भांडवल पाहिजे**— पाकिस्तानचे व्यापार मंत्री मि. रेहमान ह्यांनीं नुकतेंच असें बोलून दाखविलें कीं, पाकिस्तानच्या औद्योगिक विकासासाठी परकीय भांडवलाची जरूरी आहे. भांडवलाबरोबरच राजकीय दडपण येऊं न देण्याची काळजी मात्र घेतली जाईल. उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण करण्यापेक्षा नियुक्त अर्थव्यवस्था अमलांत आणणें योग्य होईल असा विश्वास त्यांनीं व्यक्त केला.


व्यापारविषयक मराठी मासिक

## —व्यापार उद्योग—

१ लें वर्ष सुरू झालें.
—महाराष्ट्राची औद्योगिक प्रगति करायची ना!
—सर्वांना सहजसुलभ व शक्य व्हावें म्हणून मासिकाची वार्षिक वर्गणी सहा (६ रु.) केली आहे.
[यांत खास दिवाळी अंक (१ रु.) १ खास अंक]
किरकोळ अंक ८ आणे. पानें ४८
आजच वार्षिक वर्गणीदार व्हा.
जाहिरातीचें उत्कृष्ट साधन.
नमुना अंकाकरितां ९ आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मोहाडीकर बंधू, व्यवस्थापक.
१०, गंगानिवास, रानडे रोड,
दादर, मुंबई नं. १४.



-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ
पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. १३ आक्टोबर १९४८






प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद् वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## आर्थिक दु:स्थितीवर उपाययोजना

हिंदुस्थान सरकारनें वाढत्या चलनवृद्धीवर उपाय योजण्याचें ठरवून, त्यासंबंधांत अर्थशास्त्रज्ञ, उद्योगपती, कामगारपुढारी, बँकर, इत्यादींचा सल्ला घेतला. त्याचप्रमाणें, प्रांतिक सरकारांचे व संस्थानांचे मंत्री ह्यांच्याशींहि सरकारनें विचारविनिमय केला. अखेर, ऑक्टोबरच्या ४ तारखेस सरकारनें आपली उपाययोजना जाहीर केली. ह्या योजनेंत, सरकार तात्काळ काय करणार आहे, हें सांगितलेलें आहे. सध्याच्या आर्थिक अरिष्टाचें वाढते बाजारभाव हें एक महत्त्वाचें अंग आहे आणि त्या महागाईची कारणमीमांसा अर्थशास्त्रज्ञांनीं खालीलप्रमाणें करून सरकारास कळविली होती:—(१) युद्धकाळांत सतत चालू ठेवलेली चलन वाढ. (२) युद्ध संपल्यावरहि मध्यवर्ती सरकारची तुटीचीं अंदाजपत्रकें आणि त्यांत कित्येक प्रांतांच्या तुटीच्या बजेटांची भर. (३) किंमतीवरील आणि जीवनोपयोगी जिनसांवरील नियंत्रणें दूर करण्यांत योजनेचा अभाव. (४) मोठ्या प्रमाणावर लोकांच्या हालचाली झाल्यामुळें खेळत्या पैशांत वाढ. (५) सरकारी रोख्यांस मजबुती आणण्यासाठी खेळत्या पैशांत रिझर्व्ह बँकेनें घातलेली भर. (६) काळ्या बाजारांत कमावलेल्या पैशाचें आणि कर चुकविलेल्या उत्पन्नाचें किंमतीवरील दडपण. (७) शेतकऱ्याचा आपलें उत्पादन न विकण्याकडे कल. (८) औद्योगिक उत्पादनांत घट. (९) पैशांत मोजलेल्या लोकांच्या वाढत्या प्राप्तीनें वाढत्या बाजारभावास केलेलें सहाय्य. (१०) सरकारच्या कर्जाच्या व बचतीच्या योजनांस आलेलें अपयश. हीं कारणें पुढेंहि चालू राहून चलनवृद्धि आटोक्याबाहेर जाऊं नये ह्यासाठी अर्थशास्त्रज्ञांनीं तपशीलवार उपाययोजनाहि सुचविली होती. हिंदुस्थान सरकारनें, तज्ज्ञांनीं केलेली रोगाची कारणमीमांसा मान्य केली आहे आणि त्यांच्या उपचाराच्या सर्वसाधारण योजनेस व पथ्यासहि संमति दिली आहे असें दिसतें. तथापि, किती कडक रीतीनें, बाईटपणा सोसूनहि, रोग्याच्या खऱ्या हितास प्राधान्य देऊन, उपाययोजना अंमलांत आणली जाते ह्यावरच तिचें यश अवलंबून राहील, हें उघड आहे. सरकारनें तूर्त जाहीर केलेल्या योजनेपेक्षाहि अधिक तपशिलाची योजना सरकार तयार करीत आहेच आणि उपाययोजनेच्या घोषणेकडे ह्यासंबंधांतील पहिलें पाऊल ह्या दृष्टीनेंच आपण पाहिलें पाहिजे.

समाजाच्या कोणत्याहि विशिष्ट घटकास प्राधान्य न देता किंवा न भेडसावता सर्वांचें हित पहाण्याचा प्रयत्न सरकारी धोरणांत दिसून येतो. आलेल्या अनुभवांच्या आधारावरच सरकारनें आपली योजना आखली असल्याकारणानें, सरकार जें पाऊल पुढें टाकील, त्यांत सातत्य राहील, असा विश्वास वाटतो. सामान्य माणसाच्या जीवनावश्यक जिनसा त्यास कमी किंमतीस उपलब्ध व्हाव्यात, कारखान्यांस कच्चा माल व यंत्रसामुग्री योग्य किंमतीस मिळावी, उत्पादनवाढीस प्रोत्साहन मिळावें, कामगारांच्या संबंधांतील कायद्यांत प्रगतिपर एकवाक्यता असावी, इत्यादि अनेक दृष्टींनीं जरूर ते उपाय सरकार अंमलांत आणणार आहे. हिंदुस्थान हा देश शेतीप्रधान असला, तरी त्याच्या औद्योगिक गरजांसहि सरकारी धोरणांत महत्त्वाचें व जिव्हाळ्याचें स्थान आहे ह्याची जाणीव सरकारी घोषणेंत स्पष्ट दिसून येते, ही अभिनंदनीय गोष्ट आहे. समाजाजवळील शक्य तेवढा पैसा बचतीच्या व करांच्या रूपानें एकत्रित जमा होऊन त्याचा विनियोग संघटित उत्पादनवाढीकडे व्हावा, असा सरकारी धोरणाचा अपेक्षित परिणाम आहे. सरकारच्या प्रस्तुत आर्थिक धोरणास सर्वांनीं हार्दिक पाठिंबा द्यावा; कोणत्याहि राजकीय पक्षाचे हातीं देशाचा कारभार आला, तरी देशाची आर्थिक स्थिति समाधानकारक असण्याचे बाबतींत मतभेद असण्याचें कारण नाहीं.

### निर्यात व्यापाराच्या वृद्धीचे प्रयत्न.

हिंदुस्थान सरकार देशाचा निर्यात व्यापार वाढविण्याच्या दृष्टीनें कांहीं उपाय योजण्याचा विचार करीत आहे अशी बातमी आहे. ह्या प्रयत्नाचे हेतू पुढीलप्रमाणें आहेत. (१) युद्धकालांत हातांतून गेलेल्या बाजारपेठा परत मिळविणें. (२) युद्धकालांत मिळविलेल्या नव्या बाजारपेठांतून अधिक भक्कम रीतीनें पाय रोवणें (३) नवीन बाजारपेठा मिळविणें आणि दुर्लभ असें परकीय चलन अधिक मिळविणें. हे हेतू साध्य करतांना देशांतील पुरवठा आणि परराष्ट्रीय हुंडणावळीची परिस्थिति ह्यांचा विचार सरकार अर्थातच करणार आहे. हिंदुस्थानांतून ताग व तागाचा माल, कापड, तेलें आणि गळिताचीं धान्यें निर्यात होतात. हा माल कोणत्या देशाला किती प्रमाणांत जातो अगर जावा ह्यासंबंधीं सरकार वेळोवेळीं फेरतपासणी करणार आहे. जिनीव्हा येथील जागतिक व्यापारासंबंधीच्या कराराप्रमाणें, निरनिराळ्या देशांनीं आयात मालावरील जकाती कमी केल्या आहेत; त्याचा फायदा घेण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें देशोदेशीं व्यापारी प्रतिनिधींचीं मंडळें पाठवून एकमेकाला जरूर असणाऱ्या मालाची ऐनजिनसी देवाण-घेवाण करण्याचे करारही घडवून आणण्याची खटपट करण्यांत येणार आहे. हिंदुस्थानांतील सध्याचा चलनविस्तार लक्षांत घेता, निर्यातीला आळा घालणें जरूर आहे असें एक मत प्रचलित आहे. पण हिंदुस्थानच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीनें कांहीं विवक्षित प्रकारची आयात होणें जरूरीचें आहे; आणि त्यासाठीं आणि देशांतील मालाचा पुरवठा अधिक मुबलक करण्यासाठींहि निर्यात वाढविणें आवश्यक आहे, असें तद्विरुद्ध एक मत आहे. देशाच्या तांतडीच्या व दूरगामी गरजा लक्षांत घेतां निर्यात व्यापार कमी न करता वाढविला पाहिजे असें ह्या पक्षाच्या लोकांचें मत आहे. सरकारहि निर्यात-व्यापाराच्या वृद्धीला अनुकूल आहे, असें म्हणतात.

**कराचीला विमानानें सोनें नेलें**— पाकिस्तान सरकारच्या एका विमानानें नुकतेंच ५० हजार तोळे सोनें मुंबईहून कराचीला नेलें. रिझर्व्ह बँकेजवळील सोन्याच्या साठ्यांत पाकिस्तानचा जो हिस्सा होता, त्याचा शेवटचा हप्ता आतां पाकिस्तानला मिळाला आहे.

# सरकारी धोरणावर तज्ज्ञांचा अभिप्राय

## एथवर ठीक, पुढें काय ?

हिंदुस्थानच्या अर्थमंत्र्यांनीं सरकारचें महागाई आणि टंचाई ह्याबद्दलचें धोरण जाहीर करतांच बिर्ला शेटजींनीं त्याचें स्वागत केलें. ह्यावरून नियंत्रणाच्या मोळीला, नवीन धंद्यांना आणि कारखानदारीच्या आयात मालाला दिलेल्या करमाफीच्या साखरेचें घातलेलें वेष्टण, उपयोगी पडलें असें दिसतें: वास्तविक सरकारी धोरणाबद्दलच्या अजून जाहीर न झालेल्या गोष्टी जाहीर झालेल्या गोष्टींपेक्षा अधिक महत्त्वाच्या आहेत. सरकारी खर्चांत काटकसर करणार ती किती, केव्हां व कशी ? करांत वाढ करणार ती कोणांवर कर लादून आणि किती करणार ? परराष्ट्रांतून यंत्रसामुग्री व इतर उत्पादन साधनांची सत्वर आयात करण्यास काय व्यवस्था आंखली आहे ? कापड, कागद वगैरे ज्या नित्योपयोगी वस्तूंचा येथें तुटवडा आहे त्यांच्या आयातीवरील निर्बंध ढिले होणार आहेत किंवा नाहीं ? प्रांतिक सरकारें सर्व प्रकारें नव्या धोरणाशीं सहकार्य करतील, ह्याबद्दल कोणती खबरदारी घेतली आहे ? मजूर व मध्यम वर्गाच्या रहाणीच्या खर्चांत आणि शेतकऱ्याच्या जमीन कसण्याच्या खर्चांत ज्यांचा अंतर्भाव होतो त्या सर्व जिनसांच्या पुरवठ्याबद्दल आणि भाव उतरविण्याबद्दल तात्कालिक योजना काय आहेत ? प्रत्येक धंद्यांत ठराविक योजनेप्रमाणें उत्पादन वाढत रहावें ह्याबद्दल कोणते उपाय योजण्याचें ठरलें आहे ? ह्या सर्व प्रश्नांचें उत्तर तज्ज्ञांनीं दिलेल्या सल्ल्याप्रमाणें असेल, त्याबद्दलच्या सर्व योजना तात्काल अंमलांत येणार असतील, आणि त्या धंदेवाले, कामकरी आणि जनता पूर्ण उत्साहानें पार पाडणार असतील तर महागाईची चढती कमान बंद होऊन तीन–चार वर्षांत मालाचा भरपूर पुरवठा बेताच्या भावानें होऊं लागेल. ह्या सर्व गोष्टींवर सरकारी धोरणाचा अधिक प्रकाश पडेपर्यंत जनतेला निर्धास्त राहतां येणार नाहीं.

बृहन्महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणें. } द. गो. कर्वे

## एकजुटीच्या प्रयत्नांची आवश्यकता.

चलनवाढीमुळें अधिकाधिक बिघडत जाणाऱ्या आर्थिक परिस्थितीला आळा घालण्यासाठीं जी उपाययोजना सरकारनें नुकतीच जाहीर केली आहे, तिच्यामुळें दक्षिणेंतील कारखानदारांस बरेंच समाधान वाटत आहे. प्रत्यक्ष व्यवहारांत ही उपाययोजना किती फलदायक होईल हें अर्थात अनुभवानेंच कळून येईल. तथापि औद्योगिक क्षेत्राच्या बाबतींत सरकारचें धोरण पुढें कोणतें राहील, हें वरील घोषणेमुळें बरेंच स्पष्ट झालें आहे. त्यामुळें, मध्यंतरीं इतस्ततः प्रकट झालेल्या स्वैर घोषणांमुळें कारखानदारांच्या मनांत जो संभ्रम व असहायता उत्पन्न झाली होती, ती बऱ्याच अंशांनीं दूर झाली आहे आणि आपआपले उद्योग चालविण्यास त्यांना अधिक हुरूप वाटूं लागेल ह्यांत शंका नाहीं. अलीकडे देशी उद्योगधंद्यांना भांडवल मिळण्याची मोठीच पंचाईत पडूं लागली होती. परंतु, सरकारी घोषणेचा पैसे गुंतविणाऱ्या जनतेच्या मनावरहि योग्य परिणाम घडून ह्याहि बाबतींत परिस्थिति सुधारूं शकेल, असें वाटतें. चालू असलेल्या कारखान्यांतील यंत्रसामुग्रीचा घसारा सढळ हातानें काढण्यास मोकळीक मिळत आहे, तिची जुन्या कारखानदारांना खरीखुरी आवश्यकता भासत होती. नव्या कारखान्यांना इनकमटॅक्सचे बाबतींत कांहीं वर्षें सूट मिळणार आहे. ही बाबहि उद्योगवाढीला पोषकच ठरेल. मात्र, ही इन्कमटॅक्सची सवलत निदान १०–१५ वर्षें तरी मिळावयास पाहिजे; तरच तिचा खरा फायदा होऊं शकेल.

तथापि, उत्पादनाची भरपूर वाढ झाल्याखेरीज चलनवाढीला बरोबर आळा बसणार नाहीं, ही गोष्ट कोणीहि अमान्य करूं शकणार नाहीं. सध्याच्या जुन्या सामुग्रीवर देखील सध्यापेक्षा सवापट, दीडपट उत्पादन वाढूं शकेल. परंतु ती गोष्ट कामगारवर्गानें मनावर घेतली पाहिजे. एवढ्यासाठी, कामगारांना मिळावयाच्या सवलती, त्यांचे हक्क व विविध औद्योगिक कायदे ह्या बाबतींतहि सरकारचें धोरण निश्चित होऊन त्यांची अंमलबजावणी त्वरित करण्यांत यावी. कामगारांना चांगली वागणूक व त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळावा, ही गोष्ट कारखानदारांनाहि मान्य आहे. परंतु, ह्या बाबतींत जरूर ती व्यवस्था झाल्यावरहि उत्पादन–वाढ न होऊं शकली, तर सध्याची आपत्ति कायमच रहाणार. करितां, संप घडवून आणणें अथवा उत्पादनाच्या क्रियेंत खंड पाडणें ही गोष्ट ह्यापुढें केवळ कामगार वर्गालाच नव्हे, तर साऱ्या समाजालाहि अरिष्टांत लोटणारी आहे हें ओळखुन कामगार पुढाऱ्यांनींहि आपल्या दृष्टिकोनांत जरूर तो फरक केला पाहिजे. ह्याप्रमाणें सरकार, कारखानदार व कामगार या त्रयीनें एकजुटीनें प्रयत्न केला, तरच चलनवाढीच्या दुष्परिणामाचा खरा बंदोबस्त होऊं शकेल.

किर्लोस्करवाडी. } शं. वा. किर्लोस्कर

## खर्चिक योजना स्थगित

मध्यवर्ती सरकारच्या सर्व खात्यांनीं अनावश्यक खर्च टाळावा आणि आपले खर्चाचे कार्यक्रम सरकारनें जाहीर केलेल्या आर्थिक धोरणाचे चौकटींत बसवावेत, अशी सूचना हिंदुस्थान सरकारच्या फडणिशी खात्यानें बाकीच्या खात्यांना दिली आहे. प्रांत व संस्थानें ह्यांनाहि असाच सल्ला देण्यांत आला आहे. मध्यवर्ती व प्रांतिक संवर्धक योजनांची छाननी करण्यासाठी मध्यवर्ती मंत्रिमंडळाची एक कमिटी नेमण्यांत आली आहे, तिचे डॉ. मथाई (फडणीस), श्री. नियोगी (व्यापारमंत्री), श्री. अय्यंगार (रेल्वे व वहातुक मंत्री), श्री. जयरामदास दौलतराम (अन्नमंत्री) व डॉ. मुकर्जी (उद्योग व पुरवठामंत्री) हे सभासद आहेत. एका महिन्यांत ही कमिटी आपला रिपोर्ट तयार करून, कोणत्या योजना महत्त्वाच्या आहेत, त्यांचा अनुक्रम लावील. मुंबई सरकारच्या प्रिन्सिपॉल कर्वे समितीनें, खर्चाच्या बाबींचा महत्त्वाच्या दृष्टीनें अनुक्रम लावावा व उत्पन्नाच्या बाबींची तपासणी व चौकशी करावी, असें मागेंच सुचविलें होतें, हें वाचकांच्या लक्षांत असेलच.

---

## दिवाळीचा मोठा अंक

ता. १७ रोजीं प्रसिद्ध होईल. जाहिराती पाठविणारांनीं त्या सत्वर धाडाव्या, अशी विनंति आहे.

व्यवस्थापक, " अर्थ "

### उत्पादन वाढीच्या मार्गातील सर्व अडचणी दूर करा

"आपल्या मध्यवर्ती मजूर खात्याच्या मंड्यानें कारखाने व उद्योगधंदे ह्यांचा अधिक जवळून परिचय करून घ्यावा, अशी माझी त्यांना प्रार्थना आहे. अशा परिचयामुळें त्यांना सद्यः-स्थितीची स्पष्ट कल्पना येण्यास सहाय्य होईल. आक्रमक धोरणानें विश्वास कसा निर्माण होणार? ठराविक तत्त्वांच्या केवळ पुनरुच्चारांनीं उत्पादन वाढूं शकत नाहीं. सोन्याचीं अंडीं घालणाऱ्या कोंबडीस इकडे लाथाडून तिकडे सुबत्तेची अपेक्षा करणें व्यर्थ आहे. आपल्या राष्ट्रीय सरकारबद्दल सर्वांसच स्वयंस्फूर्तीनें आपुलकी व निष्ठा वाटते; परंतु सरकारनें बेकायदेशीरपणाचें—मग त्याचें मूळ कोठेंहि असो—उच्चाटण केलें पाहिजे. महागाई व मालाचा तुटवडा ह्यांच्या अडचणींतून बाहेर पडावयाचें असेल, तर कोणत्याहि प्रकारची अंतर्गत यादवी क्षणभरहि चालू देतां कामा नये; पुरवठा-वाढीचा मार्ग सोपा झाला पाहिजे. त्याला अर्धवट पाठिंबा उपयोगाचा नाहीं; विरोध तर चालणारच नाहीं. ":—इंडियन इलेक्ट्रिकल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या पहिल्या वार्षिक सभेंत श्री. एन. डब्ल्यू. गुर्जर ह्यांचें अध्यक्षीय भाषण.

### श्री. गंगाजीराव शितोळे ह्यांचा सन्मान

श्रीनागेश्वर सहकारी को. क्रे. सोसायटी पाटस ( जि. पुणें ) या सोसायटीचे गेलीं ३२ वर्षें सातत्यानें चेअरमन म्हणून कार्य करीत असलेले सन्मान्य सहकारी कार्यकर्ते श्री. गंगाजीराव जानराव शितोळे यांचा सत्कार व छायाचित्राचें अनावरण मुंबई इलाख्याचे सहकारी व अर्थमंत्री माननीय श्री. वैकुंठराय मेहेता यांचे हस्तें गुरुवार १४ आक्टोबर १९४८ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां पाटस येथें होणार आहे.

### सोसायट्यांचे सेक्रेटरींचा ट्रेनिंग क्लास, पंढरपूर

ता. ११ आगस्ट पासून पंढरपूर येथें चाललेल्या सोसायट्यांच्या सेक्रेटरींच्या ट्रेनिंग क्लासाचा समारोप समारंभ ता. ७ आक्टोबर रोजीं दे. भ. तात्यासाहेब गुर्जर यांचे अध्यक्षतेखालीं थाटानें पार पडला. त्याप्रसंगीं मे. बाळासाो मोरे व स्थानिक सहकारी अधिकारी उपस्थित होते. मे. बाळासाहेब मोरे व तात्यासाहेब गुर्जर यांनीं सेक्रेटरींना आपल्या कर्तव्याची जाणीव देऊन सहकारी तत्त्वावर खेड्याची पुनर्घटना करणेचे कामीं त्यांनीं आपला योग्य वाटा उचलावा असें सांगितलें.

### कल्याण पीपल्स को. बँकेचा रजतमहोत्सव

दि कल्याण पीपल्स को. बँक लि. चा रजतमहोत्सव मुंबई सरकारचे अर्थ-सहकार मंत्री श्री. मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखालीं रविवार, ता. १० ऑक्टोबर रोजीं साजरा करण्यांत आला.

### दि न्यू पूना होजिअरी वर्क्स

डॉ. ठकार, श्री. बावडेकर, श्री. ब्रह्मे व श्री. जगताप ह्यांच्या वरील कारखान्याचा उद्घाटन समारंभ मंगळवार ता. १२ रोजीं मुंबई सरकारचे उद्योगमंत्री ना.जी. डी. तपासे ह्यांच्या हस्तें झाला.

पाकिस्तानांत कागदाची गिरणी—पाकिस्तान सरकारनें स्वीडन व कॅनडा ह्या देशांतील दोन एंजिनिअरिंग कंपन्यांचा सल्ला घेऊन पूर्व पाकिस्तानांत एक कागदाची गिरणी उभारण्याचें ठरविलें आहे. ही गिरणी उभारण्यांत सरकारच्या पैशाचा मोठा हिस्सा असून पुढील वर्षापासून ती सर्व पाकिस्तानची कागदाची गरज भागवूं शकेल असा अंदाज आहे. टिटाघर येथील कागदाच्या गिरणीला होणाऱ्या बांबूंचा बराच पुरवठा सिल्हेट (पूर्व पाकिस्तान) येथून होतो.

## हिंदुस्थानांतील मोटार वहानें

खालील तक्त्यांत मार्च, १९४७ अखेर हिंदुस्थानांत असलेल्या ( संस्थानें वगळून ) मोटार वहानांची तपशीलवार माहिती दिली आहे. तुलनेसाठीं, तक्त्याचे अखेर १९३९ व १९४६ बाबतचेहि आकडे दिले आहेत, त्यांवरून वहानांची वाढ लक्षांत येईल. बंगाल प्रांतांत सर्वांत ज्यास्त वहानें वाढलीं, आणि त्यांतहि मालवहातुकीच्या गाड्यांचाच भरणा अधिक होता.

| प्रांत | मोटार सायकली | खासगी मोटारी | उतारूंचा वहानें | | मालाच्या लॉऱ्या | इतर | सर्व तऱ्हेच्या मिळून मोटार गाड्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | टॅक्सी | इतर | | | |
| मद्रास | १,७३६ | १०,९५७ | ३९७ | ४,३३९ | ३,९८४ | ९७ | २१,५६० |
| मुंबई | २,१५७ | १६,४३६ | १,६०९ | ३,११२ | ८,१५२ | ... | ३१,४६६ |
| बंगाल | १,५४२ | १७,२५५ | ४,५७० | ४,६३६ | १२,४५९ | ६९ | ४०,५३१ |
| सं. प्रांत | १,२७१ | ९,८६३ | ६६६ | ३,००३ | ३,५३३ | ४७१ | १९,००७ |
| पंजाब | २,६२८ | ६,२६० | २७४ | ३,१६७ | १,९८३ | ... | १४,३१२ |
| बिहार | ८७० | ५,१११ | ४५८ | ६७२ | २,३३२ | ६ | ९,४४९ |
| मध्यप्रांत—वऱ्हाड | ७८० | २,९०१ | ९४ | ९११ | १,५१९ | ३२ | ६,२३७ |
| आसाम | ४९२ | ३,२७६ | १४२ | १,२९४ | २,९२२ | ३५५ | ८,४८१ |
| सरहद्द प्रांत | १९७ | १,१०२ | १२१ | ५०४ | ५४३ | ४ | २,४७१ |
| ओरिसा | १३० | ८०३ | २० | ३२७ | ४५६ | ... | १,७३६ |
| सिंध | ४२१ | २,३११ | १६२ | ३२७ | ८११ | ... | ४,०३२ |
| दिल्ली | १,२१६ | ३,८२३ | २१६ | ४६७ | ६३४ | ... | ६,३५९ |
| अजमीर | ३५ | ४९३ | १४ | ८० | ६४ | ... | ६८६ |
| कूर्ग | ४ | ८९ | १३ | ५१ | २५० | ... | ४०८ |
| बलुचिस्तान | १४४ | ६३८ | ४७ | १५७ | ४६५ | १८२ | १,६३३ |
| एकूण मार्च १९४७ | १३,६७३ | ८१,३१८ | ८,८०४ | २३,०५० | ४०,१०७ | १,४१६ | १,६८,३६८ |
| " " १९४६ | १०,१४२ | ७४,८४६ | ८,०६५ | २०,३२० | ३०,२९४ | १,१२६ | १,४४,६९४ |
| " " १९३९ | ८,८९८ | ९१,४७७ | ५,७४० | २०,०२३ | १८,१५८ | ... | १,४४,२९६ |

## दि रत्नाकर बँक, लि.

स्थापना : १९४३

—: शाखा :—

(१) कोल्हापूर, (२) शाहुपुरी, (३) सांगली, (४) मिरज, (५) जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | ... | २०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | ६,१७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | १०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ३८,००,००० |

*—यथावत् बँकिंग व्यवहार केले जातात—*

नामदार बी. बी. पाटील, B. A., LL. B., डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट, चेअरमन

श्री. गं. सि. चौगुले, M. L. A., कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B, मॅनेजर



## दी बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

*[ कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली. ]*

स्थापना: १९१६

मुख्य कचेरी :

सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :

(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई (१०) मांडवी–मुंबई.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था होत आहे.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.



## दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कंपनी, लि.

**हैद्राबाद संस्थानांत महत्त्वाचे ठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.**

**ठराविक कामाची हमी देऊं शकणाऱ्या वजनदार गृहस्थांनीं भेटावें अथवा लिहावें.**

| | | |
|---|---|---|
| चालू काम | ... | १ कोटीचे वर |
| चालू हप्त्यांचें उत्पन्न | ... | २,३१,१७६ रु. चे वर |
| खर्चाचें प्रमाण | ... | १४·९ टक्के |
| आयुर्विमा निधि | ... | ४ लाखाचे वर |

कंपनीच्या सोलापूर वसाहतीचे बांधकामास लवकरच सुरुवात होणार आहे.

—: काम लवकर संपविणेसाठीं :—

**मुदतीच्या ठेवी घेणें आहेत.**

मुदत व व्याजाचा दर याची माहिती कंपनीचे ऑफिसकडे मिळूं शकेल.

टी. डी. देशपांडे, बी. ए., एलएल. बी. सेक्रेटरी.

हेड ऑफिस : ८६६ सदाशिव पेठ, पुणें २.

व. न. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी. मॅनेजर.

## सहकारी बँकांचे अहवाल

### दि कोल्हापूर मराठा को. बँक लि., कोल्हापूर

बँकेच्या वसूल भांडवलांत ९,७६७ रु. ची भर पडून तें ७१,००४ रु. झालें आहे. खेळतें भांडवल गेल्या वर्ष अखेरीपेक्षा ३१ हजारांनीं वाढून तें ४,४१,५६२ रु. झालें आहे. बँकेनें अहवालाचे सालीं १,४८,१६२ रु. कर्ज दिलें व १,२२,६४७ रु. चें कर्ज वसूल होऊन ३४,१०७ रु. चें कर्ज येणें आहे. एकूण जिंदगी ४,५४,९५९ रु. ची आहे. एकूण नफा ९,४७६ रु. झाला. ७% डिव्हिडंडला ४,४९१ रु. लागले. बँकेचे चेअरमन, कर्नल के. एस. खानविलकर ह्यांच्या विनंतीवरून नऊ सभासदांनीं प्रत्येकी १,००० किंवा त्यापेक्षा ज्यास्त रुपयांचे शेअर्स घेतले, त्यांचीं नांवें व शेअर्सची रक्कम ह्यांचा रिपोर्टांत कृतज्ञतापूर्वक उल्लेख करण्यांत आला आहे.( चेअरमन : मे. कर्नल के. एस. खानविलकर झुंजारराव; ऑ. सेक्रेटरी: श्री. डी. डी. ब्रम्हपुरे; मॅनेजर श्री. व्ही. एन. यादव )

### इसलामपूर को. पीपल्स बँक लि.

वरील बँकेचें शेअर भांडवल २०,२६५ रु. असून रिझर्व्ह फंडांत १०,६७७ रु. आहेत. एकूण खेळतें भांडवल १ लक्ष, ७७ हजार रु. आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ९,३९१ रु. उत्पन्न होऊन ५,७७९ रु. खर्च झाला आणि ३,६११ रु. नफा उरला. गेल्या दोन वर्षांचे मानानें बँकेचा नफा पुष्कळच वाढला आहे. भागीदारांचे डिव्हिडंडमध्यें व बँकेच्या वेगवेगळया फंडांत कशी वाढ करतां येईल आणि थकबाकी कशी कमी करतां येईल, इकडे व्यवस्थापक मंडळीचें लक्ष आहे. ५% डिव्हिडंडला १,५१० रु. लागले (चेअरमन. श्री. म. दा. पवार; मॅनेजर: श्री. डी. डी. लाटकर )

### दि को. पीपल्स बँक लि., लिंब ( सातारा )

लिंब गांवांतील जाळपोळीमुळें स्थानिक लोकांच्या मालमत्तेचें मोठें नुकसान झालें व बँकेची कचेरीहि जळाली. बँकेचा व्यवहार स्थगित झाला. तथापि, चालकांनीं कचेरी सातारा येथें नेऊन पुनः जम बसविला, ही गोष्ट त्यांस अत्यंत भूषणावह आहे. सेक्रेटरी श्री. अभ्यंकर ह्यांचा स्वतःचा छापखाना व घर जळालें त्यांत त्यांचें स्वतःचें १५ हजार रुपयांचें नुकसान झालें. तरी, बँकेची शिल्लक ( १,२०० रु. ) व महत्त्वाचे कागदपत्र त्यांनीं जतन केले. ह्याबद्दल त्याचे श्री. मापारी ह्यांच्या अध्यक्षतेखालील बँकेचे वार्षिक सभेंत अभिनंदन करण्यांत आलें, हें योग्यच झालें. त्यांनीं बँकेच्या व्यवहाराची पुनः नीट घडी बसविली आहे. ह्या त्यांच्या कार्यनिष्ठ कामगिरीबद्दल सरकारी हिशोबतपासनीसांनींहि प्रशंसोद्गार काढले आहेत. बँकेचा व्यवहार पुनः वाढीस लागला आहे. अहवालाचे वर्षी शेअर भांडवल ३,२०० रु. नीं वाढून तें १०,०२५ रु. झालें. ८०० रु. ची प्रत्यक्ष नुकसानी हिशेबांतून कमी करूनच नफा काढला, तो ९२२ रु. झाला आहे; आणि तो अत्यंत समाधानकारकच आहे. बँकेचे चेअरमन श्री. त्रिं. मा. ठाकूर व सेक्रेटरी श्री. बा. ग. अभ्यंकर ह्यांच्या चिकाटीनें, लिंब बँकेनें स्थानिक आर्थिक जीवनास नवें वळण लावण्याचा प्रयत्न चालविला आहे; त्यांत खंड पडला असला तरी चालकांचा ध्येयवाद कायम आहे.

### दि इचलकरंजी सें. को. बँक लि.

अहवालाचे वर्षी बँकेचें स्वतःचें भांडवल १,०३,३६३ रुपयांवरून १,१९,९७० रुपयांवर गेलें आहे. बाहेरील मोठ्या तीन बँकांच्या शाखा इचलकरंजी येथें असूनहि, ठेवींचा आकडा १०½ लक्ष रुपयांचा १२½ लक्ष रुपये झाला आहे आणि खेळतें भांडवल ११½ लक्ष रु. होतें तें १४ लाखांचे जवळ पोचलें आहे. ह्या सर्व गोष्टी बँकेवरील लोकांचा विश्वास दर्शवितात. मागणीचे मानानें कर्जें देतां न आल्यानें रकमेचे देवघेवींत घट होऊन त्याचा नफ्यावर थोडासा परिणाम झाला आहे. तरतें भांडवल ठेवण्याचें धोरण योग्यच आहे. आजरे शाखेचा व्यवहार समाधानकारक वाढत आहे. बँकेस निव्वळ नफा २०,७४६ रु. झाला. म. गांधी स्मारक फंडास ५०१ रु. देण्यांत आले. ७½% डिव्हिडंडला ३,२८८ रु. लागले. ( चेअरमन: श्री. य. वि. दातार, बी. एस्सी., मॅनेजर : श्री. दौ. रा. काळे. )

### श्री वीरशैव को. बँक लि., कोल्हापूर

अहवालाचे वर्षी बँकेचें भाग भांडवल वाढून तें ३८,१७५ रु. झालें. चालू खात्यांत थोडी घट झाली तरी मुदत बंदी ठेवींत १८% भर पडली आहे. सभासदांकडे कर्जरूपानें गुंतलेलें भांडवल गेल्या वर्षी १,६५,६८६ रु. होतें, तें आता १,९८,०७१ रु. आहे. अहवालाचे वर्षी बँकेच्या एकूण नफ्यांत २,०५१ रु.ची वाढ होऊन त्याची रक्कम ८,९०९ रु. झाली. ३ लक्ष, ५ हजार रु. खेळत्या भांडवलावरील हा नफा आहे, ह्यावरून बँकेचा किफायतशीरपणा दिसून येईल. नफ्यापैकी २,२७८ रु. चा विनियोग ६¼% डिव्हिडंडकडे करण्यांत आला. ( चेअरमन : राव. बी. डी. माळी, बी. ए., एलएल. बी.; डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, कोल्हापूर; मॅनेजर : श्री. बी. बी. पाटील, ए. ए. जी. ई. )

### बॉंबे प्रॉ. को. लँड मॉर्गेज बँक लि.

अहवालाचे मुदतींत बँकेच्या शेअरभांडवलांत वाढ न होता तें ५,१२,६४० रु. इतकें राहिलें. बँकेचें डिबेंचर्सचें देणें ३९ लक्ष, ५० हजार रु. आहे. बँकेस १५ बँका जोडलेल्या आहेत. त्यांना बॉ. अॅ. डे. रि. अॅक्टामुळें नवें काम मिळणें अवघड जात आहे. त्यामुळेंच प्रांतिक बँकेचें कर्जाचें येणें २९ लक्ष, ३७ हजार रु. वरून आतां २८ लक्ष, १ हजार रु. वर उतरलें आहे. गेल्या वर्षी ३ लक्ष, ८९ हजारांचीं २७५ कर्जें देण्यांत आलीं. अहवालाचे वर्षी १ लक्ष, ८३ हजारांचीं १२२ कर्जें देण्यांत आलीं. येण्यापैकी भांडवली वसुली ९१.७% वरुन ८५.६% वर आली; व्याजाची वसुली ९९% कायम राहिली. अहवालाचे वर्षी बँकेस निव्वळ नफा ३०,४३२ रु. झाला. सिंकिंग फंड इनव्हेस्टमेंट खात्याच्या पैशांवरील १९३९ पासूनचें व्याज नफातोटा खातीं घेण्यास सरकारनें मंजुरी दिल्यामुळें ३६,०४३ रुपये ह्या खातीं अहवालाचे वर्षी एकदम जमा झाले; नाहींतर तोटाच दिसला असता. द. सा. द. शें. २ रु. १३ आ. डिव्हिडंड देण्यास १४,४१८ रु. लागतील. ( चेअरमन: श्री. नगिनदास टी. मास्टर; मॅनेजर: श्री. बी. एन. देसाई. )

### पुणें जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि.

अहवालाचे वर्षी बँकेकडे १,०३,८०० रु. कर्जमागणीचे अर्ज आले. कांहीं नामंजूर झाले, कांहींची चौकशी चालू आहे व ४ अर्जांना १२,००० रु. मंजुरी दिली व प्रकरणें पुढें पाठविलीं. कर्जवाटप मात्र झालें नाहीं. थकबाकी वाढत आहे. वसुलीसाठी पुढील वर्षी स्वतंत्र व्यवस्था करावी लागेल, असें दिसते. "बँकेचा व्यवहार सरकारी मदत मिळणार असेल तरच चालू रहाणें शक्य होणार आहे. सालोसाल तोट्यांत व्यवहार करणें अशक्यच आहे."

## हिंदच्या जीवनाच्या लौकिक व आर्थिक बाजू

हिंदला स्वातंत्र्य मिळून एक वर्ष होऊन गेलें, व स्वातंत्र्य प्राप्तीबद्दलचा पहिला वार्षिक उत्सव मामुली रीत्या साजरा झाला. स्वतंत्र राष्ट्र ह्या नात्यानें विशेषतः आंतरराष्ट्रीय जगांत हिंदला बरेंच महत्त्व प्राप्त झालें आहे. यूनो, आंतरराष्ट्रीय चलन निधी, जागतिक बँक, यूनेस्को, इ. अनेक संस्थांचा सभासद म्हणून स्वतंत्र हिंदला मानाचें स्थान आहे. हिंदचे परराष्ट्रीय वकीलहि महत्त्वाच्या सर्व राष्ट्रांमध्यें नेमण्यांत आले आहेत. त्याचबरोबर घटना परिषदेनें राज्यघटनेचा मसुदाहि तयार केला आहे व तो लौकरच अंमलांतहि येईल. हिंदमध्यें लोकशाहीच्या तत्त्वावर राज्यकारभार चालतो व येथें उल्लेखिलेल्या गोष्टीमुळें जागतिक राजकारणांत हिंदला मानाचें स्थान प्राप्त झालें आहे. संस्थानांचा प्रश्नहि समाधानकारक रीतीनें सोडविण्यांत आला व येत आहे.

परंतु बाह्य लौकिकाच्या वरील गोष्टी सोडल्या व अंतस्थ परिस्थितीचें निरीक्षण करूं लागलों म्हणजे निराशाजनक चित्र दिसतें. कोणतेंहि राष्ट्र आर्थिक दृष्ट्या संपन्न असेल तरच तें परिस्थितीला तोंड देऊं शकतें. अमेरिकेच्या अलिकडच्या असामान्य महत्त्वावरून ही गोष्ट अगदीं स्पष्ट होते. ब्रिटनचा बाह्य लौकिक मोठा असला तरी दुसऱ्या महायुद्धामध्यें झालेल्या भयंकर हानीमुळें ब्रिटनच्या आर्थिक व औद्योगिक जीवनाला जोराचा धक्का बसला आहे व पैशासाठी ब्रिटनला अमेरिकेच्या आहारीं जावें लागलें आहे. हिंदची परिस्थिति लौकिकदृष्ट्या लोकशाहीचें राष्ट्र म्हणून समाधानकारक असली, तरी लोकशाही टिकण्याला आवश्यक असे लोकशाहीचें वातावरण अद्याप आपल्या देशांत निर्माण व्हावयाचें आहे. आर्थिक जीवनाच्या दृष्टीनें विचार केला असतां स्वातंत्र्य मिळून एक वर्ष होऊन गेलें तरी आपलें आर्थिक जीवन बिलकूल सुधारलेलें नाहीं. ब्रिटनच्या कारखान्यांचें महायुद्धांत पुष्कळ नुकसान झालें, तरीहि अत्यंत चिकाटीनें प्रयत्न करून युद्धपूर्वीची उत्पादनाची मर्यादा १९४७ सालीं ब्रिटननें गांठली. परंतु हिंदमध्यें मात्र सर्व तऱ्हेचें उत्पादन घटत चाललें असून, १९३९ च्या उत्पादनाशीं तुलना करतांना आपलें उत्पादन दहा टक्के तरी कमी आहे. आपला राहाणीचा दर्जा अत्यंत निकृष्ट आहे, जनतेचें आरोग्य असमाधानकारक आहे, शेतीवर वाजवीपेक्षां जास्त दडपण आहे, रेल्वे, कापडगिरण्या, सिमेंट व साखर इ. चे कारखाने देशांत असले तरी कारखान्यांना लागणारी यंत्रसामुग्री परदेशांतून आणावी लागते. उद्योगधंदे जे थोडेसे आहेत तेहि पूर्णपणें परावलंबी स्थितींत आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या एका वर्षांत महागाई फार वाढली व उत्पादन घटलें. उत्पादन वाढवून रहाणीचें मान सुधारण्याचे जोरदार प्रयत्न करण्याचें महत्त्व सर्वांस पटलेलेंच आहे, आणि ह्या कार्मी सरकारास सर्वांनीं हार्दिक व सक्रिय पाठिंबा दिला पाहिजे.

---

### वेलदोडे

हिंदुस्थानांत वेलदोड्यांचें वार्षिक उत्पादन २७,००० मण आहे व त्याची किंमत सुमारें ५२ लक्ष रु. भरते. एकूण १,१६,००० एकर लागवडीपैकी ४९% लागवड त्रावणकोर संस्थानांत होते. १०,००० मण वेलदोड्यांची निर्गत होत असे. स्वीडन, अमेरिका व जर्मनी ह्यांचेकडेच ती मुख्यतः होई. आतां मध्य पूर्वेतील देशांमधील बाजारपेठ वाढली आहे.

नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.










आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी
★ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ★
९६ नारायण पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व प्रो. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.